**कशी आहे माझी मराठी?......**

मराठी..

माझी मायबोली!
म्हणून ती आपली....

शब्दांनी नटली!
म्हणून भावली.....

काव्यांत रंगली!
म्हणून आवडली....

सुरात  गायली
म्हणून रंगली...!

लेखांत गुंफली!
म्हणून समजली....

कथेत गुंतली!
म्हणून रमली...

कादंबरीत घुसली!
म्हणून रेंगाळली....

विनोदांनी हसली !
म्हणून बिलगली....

नवरसांत नहाली !
म्हणून समृध्द झाली...

अशी मराठी आपली
जिवाभावाची झाली!

**...........चित्रा मेहेंदळे**